Annixure III

श्री. गजानन महाराज संस्थान, पुसद जिल्हा यवतमाळ.

या संस्थेस नवीन आयुर्वेद महाविद्यालय सुरु करण्यास सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षापासून मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग.
शासन निर्णय क्र. एडीआर-१४९१/२०६३/सीआर-२४४/९१/आयडी-७.
मंत्रालय, मुंबई-४०००३२. दिनांक: ३ मार्च, १९९३.

<u>शासन निर्णय</u> :- श्री. गजानन महाराज संस्थान, पुसद, जिल्हा यवतमाळ या संस्थेने शासनाकडे ता. पुसद जि. यवतमाळ येथे नवीन आयुर्वेद महाविद्यालय सुरु करण्याची परवानगी मागितली होती व ती बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. सदर शासन निर्णयाद्वारे श्री. गजानन महाराज संस्थान, पुसद जि. यवतमाळ या संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर पुसद, जि. यवतमाळ येथे सन १९९२-९३ पासून नवीन आयुर्वेदिक महाविद्यालय सुरु करण्यास विहीत अटींच्या अधीन राहून एक विशेष बाब म्हणून तात्पुरती परवानगी देण्यात येत आहे.

३. सदर महाविद्यालयास संलग्नीकरणासाठी अमरावती विद्यापीठाने मान्यता दिल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊ नये आणि केंद्रीय भारतीय चिकित्सा परिषदेची नवीन आयुर्वेद महाविद्यालयाला मान्यता मिळविण्याची जबाबदारी संस्थेची राहील या अटींच्या अधीन राहून खालील अटी संस्थेवर बंधनकारक राहतील.

१) आयुर्वेदाचे महाविद्यालयाची प्रवेश क्षमता ५० इतकी राहील. केंद्रीय भारतीय चिकित्सा परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता प्राप्त झाल्याशिवाय प्रवेश क्षमता वाढविण्याचा विचार करता येणार नाही.

२) वार्षिक शैक्षणिक शुल्क प्रत्येक विद्यार्थ्यासाठी रु. १५,०००/- पेक्षा जास्त आकारण्यात येऊ नये.

३) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जागा राखून ठेवण्याबाबत संस्थेच्या व्यवस्थापन जागांच्या प्रवेशाबद्दल कोणताही निर्बंध संस्थेवर असणार नाही.

४) प्रवेश क्षमतेपैकी ५० टक्के जागा संस्थेने भराव्यात व उरलेल्या ५०टक्के जागा सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट "अ" प्रमाणे भराव्यात.

५) एकूण प्रवेश संख्येपैकी ५० टक्के जागा व्यवस्थापनाच्या इच्छेनुसार भराव्यात. व या जागांसाठी विद्यार्थ्याने किमान ४०टक्के गुण मिळविलेले हवे. भौतिक शास्त्र (फिजिक्स) रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयात मिळून ४०% पेक्षा कमी गुण असू नयेत. तसेच विद्यार्थी एकाच प्रयत्नात उत्तीर्ण झालेला असावा. उर्वरित जागा सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे भराव्यात.

६) साधारणपणे आयुर्वेद महाविद्यालयांच्या प्रवेशासंबंधी शासनाचे जे प्रवेश नियम आहेत, त्याच धर्तीवर खाजगी संस्थांना जे सुयोग्य ठरतील असे ते प्रवेश नियम विहित केले आहेत.

-२-

Principal
Ayurved Mahavidyalay
Pusad

Ayurved Mahavidyalaya ★ PUSAD ★

Principal
Ayurved Mahavidyalaya
Pusad

Principal
Ayurved Mahavidyalay
Pusad

७) विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी संस्थेने एक निवड समिती नेमावी व त्यात शासनाचे प्रतिनिधी म्हणून सहाय्यक आयुर्वेद संचालक, ३ नागपूर हे रहातील.

८) आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या शिक्षणाचा दर्जा हा भारतीय चिकित्सा परिषद, नवी दिल्ली, केंद्र शासन व राज्य यांच्या मानक दंडकाप्रमाणे असणे अत्यंत आवश्यक आहे व हे दंडक तात्काळ संस्थेने पूर्ण करणे आवश्यक आहे, म्हणून संबंधित संस्थेवर खालील गोष्टी बंधनकारक राहतील.

अ) एका विद्यार्थ्याला ३ खाटा या प्रमाणानुसार आयुर्वेदिक महाविद्यालयांना संलग्न असणारी जी रुग्णालये आहेत त्यात १५० खाटांची यथायोग्य व कायम स्वरूपात व्यवस्था केली पाहिजे. संस्थेने शैक्षणिक दर्जानुसार आयुर्वेद महाविद्यालयात संलग्न असे स्वतःचे रुग्णालय तात्काळ उभारावे व शासनास त्याप्रमाणे कळवावे.

ब) शासनाची एक उच्चस्तरीय समिती या वैद्यकीय महाविद्यालयातून शिक्षणाचा दर्जा व प्रगती योग्यरीतीने होत आहे किंवा नाही या गोष्टीवर लक्ष ठेवून शासनास योग्य त्या शिफारशी करील.

क) वैद्यकीय शिक्षणासंबंधी अस्तित्वात असलेले व पुढे अस्तित्वात येणारे हे कोर्ट नियम असतील ते याही संस्थेवर बंधनकारक राहील.

९) या महाविद्यालयांच्या प्रशासनावर कार्यक्षमतेसंबंधी शासनाचे नियंत्रण असण्यासाठी शासनाचा एक प्रतिनिधी संस्थेच्या कार्यकारी मंडळावर राहील.

१०) आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी अनुदानाची मागणी या संस्था शासनाकडे करणार नाहीत असे लेखी अभिवचन त्यांनी शासनास दिले पाहिजे.

११) उपरोक्त अट क्रमांक ५ संबंधीचे स्पष्टीकरण सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये पहावे.

१२) केंद्रीय भारतीय चिकित्सा परिषद, नवी दिल्ली यांना विहित केलेल्या अटी पूर्तता करणे महाविद्यालयास त्या परिषदेची मान्यता देणे संस्थेवर बंधनकारक राहील.

वरील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेने शासनाला लेखी लिहून देणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[signature]

( दु. श्री. कंटक )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

## परिशिष्ट "५"

विना अनुदान तत्वावरील खाजगी आयुर्वेद महाविद्यालयांसाठी प्रवेश अर्ज नियम:-

एकूण १०० प्रवेश जागा हे प्रमाण ठरवून खालीलप्रमाणे करण्यात याव्या :-

१) संस्थेच्या एकूण ५० प्रवेश जागांपैकी ५ प्रवेश जागा आपल्या इच्छेनुसार संस्था भरतील. उरलेल्या जागांपैकी -

अ) ३६ प्रवेश जागा स्थानिक उमेदवारांसाठी गुणवत्तेनुसार भराव्यात. स्थानिक मर्यादा संस्थेने ठरवाव्यात. परंतु ही स्थानिक मर्यादा ठरविण्यापूर्वी प्रत्येक संस्थेने स्थानिक मर्यादेच्या संबंधीचा ठराव पारित करावा व शासनाची तशी परवानगी घ्यावी. प्रचलित नियमांनुसार मागासवर्गीयांकरिताच्या आरक्षणाबाबतची दक्षता घेतली जावी.

ब) ९ प्रवेशजागा संस्थेकडे संपूर्ण महाराष्ट्रातून प्राप्त झालेल्या अर्जांमधून गुणवत्तेनुसार भराव्यात. प्रचलित नियमानुसार मागासवर्गीयांकरिताच्या आरक्षणाबाबतची दक्षता घ्यावी.

२) संस्थेने अर्जाचा नमुना वरील अ.क्र. ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे विहित नमुन्याप्रमाणे तयार करावा.

३. अ) भारतीय नागरिकत्व धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. मात्र संस्थेच्या १० टक्के जागांपैकी १ जागा पर्यंत अनिवासी नागरिकास ही अट लागू नाही.

ब) विद्यार्थ्याचे वय प्रवेश घेण्यापूर्वी किंवा संबंधित शैक्षणिक वर्षातील दिनांक ३१ डिसेंबर रोजी पूर्ण १७ वर्षे पूर्ण असले पाहिजे.

क) गुणवत्तेनुसार संस्था ज्यांना प्रवेश देईल त्या यादीतील एखादा विद्यार्थी विहित अपेक्षित [illegible] परंतु तो जर गुणवत्ता यादीमध्ये असेल तर अशा विद्यार्थ्याला १५ वर्षे पूर्ण [illegible] पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश देण्यात यावा. अशा प्रवेश घेणाऱ्या वेळी इतर विद्यार्थ्यांसाठी केलेल्या गुणवत्ता यादीत तो पात्र ठरतो किंवा नाही हे पाहण्याची आवश्यकता राहणार नाही. जर संबंधित विद्यार्थ्याने त्यांच्या पुढील शैक्षणिक वर्षात हा फायदा घेतला नाही तर तो तेथे मिळण्यास तो पुनः पात्र ठरणार नाही.

४) शैक्षणिक अर्हता :- अ) आयुर्वेद महाविद्यालयात प्रवेश मिळण्यास पात्र होण्यासाठी म्हणून विद्यार्थी बारावीची परीक्षा किंवा तत्सम परीक्षा विज्ञान [भौतिक, रसायन व जीवशास्त्र] हा विषय घेऊन तसेच इंग्रजी हा विषय घेऊन उत्तीर्ण झाला पाहिजे. या परीक्षेत एकत्र घेतलेले विज्ञान व रसायनशास्त्र व जीवशास्त्र विषयांमध्ये विद्यार्थ्याला किमान ५० टक्के गुण मिळाले असले पाहिजेत. ही अट व्यवस्थापनाच्या मर्जीनुसार भरल्या जाणाऱ्या १०८ जागांसाठी सुद्धा बंधनकारक आहे.

ब) संस्थेच्या इच्छेनुसार १० टक्के विद्यार्थ्यांबाबत :- संबंधित विद्यार्थी भारतातील किंवा विदेशातील कोणत्याही मान्यताप्राप्त शिक्षण संस्थामधून [१०+२] बारावीची परीक्षा किंवा तत्सम परीक्षा विज्ञान [भौतिक, रसायन व जीवशास्त्र] या विषयात उत्तीर्ण असावा. मात्र विदेशातील विद्यार्थ्यांची संख्या २ पेक्षा जास्त नसावी.

...२/-

Principal
Ayurved Mahavidyalay
Pusad

Ayurved Mahavidyalaya * PUSAD *

Principal
Ayurved Mahavidyalaya
Pusad

Principal
Ayurved Mahavidyalaya,
Pusad
Principal
Ayurved Mahavidyalay

परिशिष्ट "[illegible]"

विना अनुदान तत्त्वावरील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांसाठी प्रवेश अर्ज नियम :-

एकंदर १०० प्रवेश जागा हे प्रमाण धरून वाटप खालीलप्रमाणे करण्यात यावे :-

१] संस्थेच्या एकंदर ५० प्रवेश जागांपैकी ५ प्रवेश जागा आपल्या इच्छेनुसार संस्था भरतील. उरलेल्या जागांपैकी -

अ] २८ प्रवेश जागा स्थानिक उमेदवारांसाठी गुणवत्तेनुसार भराव्यात. स्थानिक मर्यादा संस्थेने ठरवाव्यात. परंतु ही स्थानिक मर्यादा ठरविण्यापूर्वी प्रत्येक संस्थेने स्थानिक मर्यादेच्या संदर्भात ठराव पास करावा व शासनाची तशी परवानगी घ्यावी. प्रचलित नियमानुसार मागासवर्गीयांकरिताच्या आरक्षणाबाबतची दक्षता घेतली जावी.

ब] १२ प्रवेशजागा संस्थेकडे संपूर्ण महाराष्ट्रातून प्राप्त झालेल्या अर्जांमधून व गुणवत्तेनुसार भराव्यात. प्रचलित नियमानुसार मागासवर्गीयांकरिताच्या आरक्षणाबाबतची दक्षता घेतली जावी.

२] संस्थेने अर्जाचा नमुना वरील अट क्रमांक ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे विहित नमुन्याप्रमाणे तयार करावा.

३. अ] भारतीय नागरिकत्व धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. मात्र संस्थेत १० टक्के जागांपैकी १ जागा पर्यंत अनिवासी नागरिकास ही अट लागू नाही.

ब] विद्यार्थ्यांचे वय प्रवेश घेण्याच्या वेळी किंवा संबंधित शैक्षणिक वर्षातील दिनांक ३१ डिसेंबर रोजी पूर्ण १७ वर्षे पूर्ण असले पाहिजे.

क] गुणवत्तेनुसार संस्था ज्यांना प्रवेश देईल त्या यादीतील एखादा विद्यार्थी [illegible] वयापेक्षा कमी [illegible]. परंतु तो जर गुणवत्ता यादीमध्ये असेल तर अशा विद्यार्थ्याला १७ वर्षे पूर्ण [illegible] पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश देण्यात यावा. अशा प्रवेश घेण्याच्या वेळी इतर विद्यार्थ्यांसाठी केलेल्या गुणवत्ता यादीत तो पात्र ठरतो किंवा नाही हे पाहण्याची आवश्यकता राहणार नाही. जर संबंधित विद्यार्थ्याने वयाच्या पुढील शैक्षणिक वर्षात हा फायदा घेतला नाही तर तो संधी मिळण्यास तो पुन: पात्र ठरणार नाही.

४] शैक्षणिक अर्हता :- ३] वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळण्यास पात्र होण्यासाठी म्हणून विद्यार्थी बारावीची परीक्षा किंवा तत्सम परीक्षा विज्ञान [भौतिक, रसायन व जीवशास्त्र] [illegible] हा विषय घेऊन उत्तीर्ण झाला पाहिजे. या परीक्षेत एकत्रित पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र व जीवशास्त्र विषयासहित विद्यार्थ्याला किमान ५० टक्के गुण मिळाले असले पाहिजेत. ही अट व्यवस्थापनाच्या मर्जीनुसार भरल्या जाणाऱ्या १०% जागांसाठी सुद्धा बंधनकारक आहे.

ब] संस्थेच्या इच्छेनुसार १० टक्के विद्यार्थ्यांबाबत :- संबंधित विद्यार्थी भारतातील किंवा विदेशातील कोणत्याही मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेमधून [१०+२] बारावीची परीक्षा किंवा तत्सम परीक्षा विज्ञान [भौतिक, रसायन व जीवशास्त्र] या विषयांसह उत्तीर्ण असावा. अशा विदेशातील विद्यार्थ्यांची संख्या २ पेक्षा जास्त नसावी.

क] स्थानिक विद्यार्थ्यांबाबत :- संबंधित विद्यार्थी स्थानिक भागामधून कोणत्याही मान्यताप्राप्त शिक्षण संस्थामधून [१०+२] बारावी परीक्षा किंवा तत्सम परीक्षा विज्ञान [भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र] हा विषय घेऊन इंग्रजीसह या विषयात उत्तीर्ण असावा.

ड] इतर विद्यार्थ्यांबाबत :- संबंधित विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त शिक्षण संस्थामधून [१०+२] बारावीची परीक्षा किंवा तत्सम परीक्षा विज्ञान [भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र] हा विषय घेऊन इंग्रजीसह या विषयात उत्तीर्ण असावा.

५] विद्यार्थ्यांनी खालील दर्शविलेली प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील:-

[१] भारतीय नागरिकत्वाचे प्रमाणपत्र [हे प्रमाणपत्र विदेशातील विद्यार्थ्यांना आवश्यक नाही.]
[२] जन्मतारखेचा दाखला
[३] बारावी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र
[४] शालांत परीक्षेचे प्रमाणपत्र.
[५] बारावीच्या परीक्षेचे गुणपत्रक
[६] विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेण्यास शारीरिकदृष्ट्या पात्र आहेत किंवा नाही याचा रजिस्टर्ड वैद्यकीय व्यवसायीकडील प्रमाणपत्र.

६] गुणातून काही गुण वजा करण्यासंबंधी व बोनस गुण देण्यासंबंधीची शासनाची तरतूद आहे ती संस्थेवर बंधनकारक राहील.

७] घातपात व हिंसा :- शासनाने केलेले विविध नियम व कायदे यानुसार एखादा विद्यार्थी जर राष्ट्र विघातक कार्य करतो किंवा त्यात गुंतला आहे असे जर आढळले तर संस्थेने त्या विद्यार्थ्यांना काढून टाकले पाहिजे.

जर एखाद्या विद्यार्थ्याने खोटे प्रमाणपत्र किंवा खोटे प्रतिज्ञापत्र त्याच्या प्रवेशाच्या वेळेस दाखल केले असल्याचे आढळून आले तर त्याचा प्रवेश संस्थेने तात्काळ रद्द करावा.

संस्थेत विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करीत असताना रॅगिंग करीत असल्याचे आढळून आले किंवा सिद्ध झाले तर अशा विद्यार्थ्यांवर संस्थेने तातडीने कार्यवाही करून प्रवेश रद्द करावा. प्रत्येक विद्यार्थ्याकडून संस्थेने रॅगिंगसंबंधीचे हे नियम मान्य असल्याचे एक हमीपत्र लिहून घ्यावे.

टीप :- संबंधित संस्थांनी प्रवेशाचे अंतिम नियम छापावे

८] उपरोक्त संस्था जोपर्यंत केंद्रीय भारतीय चिकित्सा परिषदेद्वारा मान्यताप्राप्त होऊ शकत नाही, तोपर्यंत तेथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय आयुर्वेद व अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयात बदलीने प्रवेश किंवा परस्पर बदलीने प्रवेश मिळणार नाही हे समजले असे संस्थेने विद्यार्थ्यांकडून लेखी घ्यावे.

९] उपरोक्त वैद्यकीय महाविद्यालयातून विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतरही शासन अशा विद्यार्थ्यांना नोकरीची हमी देणार नाही हे विद्यार्थ्यांना कळवावे.

१०] उपरोक्त संस्थेने विद्यापीठाशी अभ्यासक्रमाचे संलग्नीकरण परस्पर करून घ्यावे.

Principal
Ayurved Mahavidyalaya
Principal
Ayurved Mahavidyalaya,
Pusad

Principal
Ayurved Mahavidyalay

Ayurved Mahavidyalaya * PUSAD *

Principal
Ayurved Mahavidyalaya
Pusad

क] स्थानिक विद्यार्थ्यांबाबत :- संबंधित विद्यार्थी त्या त्या भागामधून कोणत्याही मान्यताप्राप्त शिक्षण संस्थामधून [१०+२] बारावी परीक्षा किंवा तत्सम परीक्षा विज्ञान [भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र] हा विषय घेऊन इंग्रजीसह या विषयात उत्तीर्ण असावा.

ड] इतर विद्यार्थ्यांबाबत :- संबंधित विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त शिक्षण संस्थामधून [१०+२] बारावीची परीक्षा किंवा तत्सम परीक्षा विज्ञान [भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र] हा विषय घेऊन इंग्रजीसह या विषयात उत्तीर्ण असावा.

५] विद्यार्थ्यांचे खाली दर्शविलेली प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील:- [हे प्रमाणपत्र विदेशातील विद्यार्थ्यांस आवश्यक नाही.]

[१] भारतीय नागरिकत्वाचे प्रमाणपत्र
[२] जन्मतारखेचा दाखला
[३] बारावी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र
[४] शाळेत वर्तणुकीचे प्रमाणपत्र.
[५] बारावीच्या परीक्षेचे गुणपत्रक
[६] विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेण्यास शारिरिकदृष्ट्या पात्र आहेत किंवा नाही याचा रजिस्टर्ड वैद्यकीय प्रॅक्टीशनरचे प्रमाणपत्र.

६] गुणातून काही गुण वजा करण्यासंबंधी व दोनत गुण देण्यासंबंधीची शासनाची तरतूद आहे ती संस्थेवर बंधनकारक राहील.

७] वागणूक व शिस्त :- शासनाने केलेले विविध नियम व कायदे यानुसार एखादा विद्यार्थी नर राष्ट्र विघातक कार्य करतो किंवा त्यात गुंतला आहे असे जर आढळले तर संस्थेने त्या विद्यार्थ्यांना काढून टाकले पाहिजे.

जर एखाद्या विद्यार्थ्याने खोटे प्रमाणपत्र किंवा खोटे प्रतिज्ञापत्र त्याच्या प्रवेशाच्या वेळेस दाखल केले असल्याचे आढळून आले तर त्याचा प्रवेश संस्थेने तात्काळ रद्द करावा.

संस्थेत विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करीत असताना रॅगिंग करीत असल्याचे आढळून आले किंवा सिद्ध झाले तर अशा विद्यार्थ्यांवर संस्थेने तात्काळ कार्यवाही करुन प्रवेश रद्द करावा. प्रत्येक विद्यार्थ्याकडून संस्थेने वागणुकीसंबंधी चे नियम मान्य असल्याचे एक हमीपत्र लिहून घ्यावे.

<u>टीप :- संबंधित संस्थांना याप्रमाणे अर्हता नियम छापावे</u>

८] उपरोक्त संस्था जोपर्यंत केंद्रीय भारतीय चिकित्सा परिषदेद्वारा मान्यताप्राप्त होऊ शकत नाही, तोपर्यंत तेथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय आयुर्वेद व अनुदानीत आयुर्वेद महाविद्यालयात बदलीने प्रवेश किंवा परस्पर बदलीने प्रवेश मिळणार नाही हे समजले असे संस्थेने विद्यार्थ्यांकडून लेखी घ्यावे.

९] उपरोक्त वैद्यकीय महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतरचे शासन अशा विद्यार्थ्यांना नोकरीची हमी देणार नाही हे विद्यार्थ्यांना कळवावे.

१०] उपरोक्त संस्थेने विद्यापिठाशी अभ्यासक्रमाबाबतचे संलग्नीकरण परस्पर करुन घ्यावे.

Ayurved Mahavidyalaya * PUSAD *
Principal
Ayurved Mahavidyalaya
Pusad
Principal
Ayurved Mahavidyalaya
Pusad
Principal
Ayurved Mahavidyalaya
Pusad

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मुख्य सचिव,
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
संचालक, आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई ४०० ०१८.
सहाय्यक संचालक, आयुर्वेद, पुणे/नागपूर/मुंबई.
सचिव, विधानमंडळ सचिवालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रबंधक, उच्च न्यायालय [ओरिजिनल साईड][पत्राद्वारे]
प्रबंधक, उच्च न्यायालय [ अपिलेट साईड][पत्राद्वारे]
महासंचालक, प्रसिध्दी व माहिती संचालनालय, मुंबई.
सर्व मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक.
मंत्रालयीन सर्व विभाग,
शिक्षण विभाग [ सा. शि. १/व सा. शि.-३/वि. शि. २/] मंत्रालय, मुंबई.
शासकीय आयुर्वेद महाविद्यालयांचे सर्व अधिष्ठाता.
अध्यक्ष, श्री. गजानन महाराज संस्थान, पुसद, जि. यवतमाळ.
कुलगुरु, अमरावती विद्यापीठ, अमरावती.
निवडनस्ती [एमईडी-७]

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मुख्य सचिव,
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
संचालक, आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई ४०० ०१८.
सहाय्यक संचालक, आयुर्वेद, पुणे/नागपूर/मुंबई.
सचिव, विधानमंडळ सचिवालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रबंधक, उच्च न्यायालय [ओरिजिनल साईड][पत्राद्वारे]
प्रबंधक, उच्च न्यायालय [अपिलेट साईड][पत्राद्वारे]
महासंचालक, प्रसिध्दी व माहिती संचालनालय, मुंबई.
सर्व मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक.
मंत्रालयीन सर्व विभाग,
शिक्षण विभाग [सं. शि. १/व सा. शि.-३/वि. शि. २/] मंत्रालय, मुंबई.
शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाचे सर्व अधिष्ठाता,
अध्यक्ष, श्री. गजानन महाराज संस्थान, पुसद, जि. यवतमाळ.
कुलगुरु, अमरावती विद्यापीठ, अमरावती.
निवडनस्ती [एमईडी-७]

Principal
Ayurved Mahavidyalaya
Pusad

Ayurved Mahavidyalaya * PUSAD *

Principal
Ayurved Mahavidyalaya
Pusad

# SHIR GAJANAN MAHARAJ SANSTHAN, PUSAD

## REG.NO.A/582(YTL)

| Sr.no | Name of Director | Designation |
|---|---|---|
| 1 | SHRI.R.M. JANGID | PRESIDENT |
| 2 | ADV.B.B. JILLAWAR | SECRETARY |
| 3 | DR.A.R. TAGALPALLEWAR | MEMBER |
| 4 | DR.V.L. JAJU | MEMBER |
| 5 | SMT.P.S. BHANDARI | MEMBER |

Ayurved Mahavidyalaya * PUSAD *

Principal
Ayurved Mahavidyalaya